
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-IX, Issue-II
April - June - 2019
Marathi
Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with OKEN Scanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II Marathi April - June - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal "AJANTA". Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.5** (www.sjifactor.com)

Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.


Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Prof. Dinesh R. Jaronde**
Head of Psychology Dept.
Indira Mahavidyalaya Kalamb, Yavatmal.

**Dr. Sidhharth Bhagat**
Head of Marathi Dept. Art & Commerce
Mahavidyalaya, Ralegoan, Yavatmal.

**Prof. Pravin Walke**
Dept. of History, Jagannath Maharaj Mahavidyalaya,
Wani, Yavatmal.

**Ku. Manjusha Walke**
Assistant Teacher, ZPUP School Narsapur,
Kalamb, Yawatmal.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | वस्तु व सेवा कर (जी.एस.टी.)<br>**प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.** | ५४-५८ |
| १३ | ऐतिहासिक यशस्वी महिला<br>**प्रा. जगदाळे किरण आगतराव** | ५९-६३ |
| १४ | साहित्य आणि पत्रकारीतेमध्ये भाषेचे स्थान<br>**प्रा. डॉ. विनायक तुकाराम टाळकुटे** | ६४-६७ |
| १५ | महिला सबलीकरण आणि अर्थसंकल्प<br>**डॉ. प्रा. व्हि. एम. घुबळे** | ६८-७१ |
| १६ | भारतीय व्यवस्थेपूढील आव्हाने<br>**प्रा. डॉ. अवथरे जयेश मो.** | ७२-७६ |
| १७ | मराठी ग्रामीण कादंबरीतील दलित जाणिवांचे चित्रण<br>**डॉ. शिवानंद मच्छिंद्र गिरी** | ७७-८० |
| १८ | स्वतंत्र भारतात लोकशाही : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>**Prof. Dr. Mukunda Gopalrao Meshram** | ८१-८५ |
| १९ | आंबेडकरवादी समीक्षा : स्वरुप व विवेचन<br>**डॉ. इंद्रजीत ओरके** | ८६-९३ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजूरमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | ९४-९७ |
| २१ | कश्मीरी संगीत का इतिहास और संगीतकार-शासक<br>**इकबाल हुसैन मीर** | ९८-१०१ |
| २२ | लोकतांत्रिक विकेन्द्रीकरण से बदलती गाँवों की तस्वीर (कोडरमा जिले के संदभ्र में)<br>**प्रियंका कुमारी** | १०२-१०८ |
| २३ | शिक्षा के क्षेत्र में महिलाओं की भूमिका<br>**सौ. रुपाली अमित अग्रवाल** | १०९-११० |
| २४ | शिवकालीन मजलीसची कार्यपद्धती<br>**प्रा. हरीदास मंगरु वाकुलकर** | १११-११५ |




Scanned with OKEN Scanner

# १८. स्वतंत्र भारतात लोकशाही : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

**Prof. Dr. Mukunda Gopalrao Meshram**
Smt. R. B. Tidke College Mouda, Dist. Nagpur.

भारतात लोकशाहीच्या प्रदीर्घ परंपरा नाहीत. येथील सामान्य माणूस जुलूम, जातीयता, गुलामगिरी, असुरक्षितता, दारिद्रय, निरक्षरता, अधोगती आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमता इ. भीषण अरीष्टांनी अगतिक आहे. हा विकास वंचित सर्वहारा समुदाय संसदीय पध्दतीमुळे उन्नत होवू शकतो. असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आशावाद होता. कारण संसदीय लोकशाही मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरूपाशी सुसंगत ठरते. असा त्यांचा विश्वास होता. आपल्याला या समाजरचनेत मानाचे स्थान आहे, अशी भावना या पध्दतीत लोकांमध्ये दृढमूल होते, असे त्यांचे मत होते. घटना समितीसमोर भाषण करताना ते म्हणतात," ही पध्दत तात्काळ स्वातंत्र्य, संपत्ती, सुख ही साध्ये संपादू शकत नसली तरी तिला विशिष्ट हेतु व दिशा निश्चितच असते. सर्वांना समान मताधिकार देण्यातून या पध्दतीचा प्रारंभ होतो. तसेच व्यक्तिच्या जीवनावश्यक गरजांकडे लक्ष पुरविल्याखेरीज ती यशस्वीही होत नाही. भारतात संसदीय लोकशाही यशस्वी व्हावी. या करीता त्यांनी काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

1. आर्थिक विकास (Economic Development)

लोकशाहीचे अस्तित्व आर्थिक समतेवर विसंबून आहे. त्यासाठी आर्थिक विकेंद्रीकरण करून न्याय्य वितरणप्रणाली निर्माण करणे.

2. शिक्षण प्रसार (Spread of Education) – लोकांच्या सर्वकष सहभागासाठी त्यांच्या जागृत अभिमुखता अहर्निश ठरतात. हे कार्य शिक्षणामूळेच शक्य आहे. म्हणून सांसदीय लोकशाहीच्या यशासाठी शिक्षण प्रसार महत्वाचा ठरतो. त्यामूळे समस्यांची उकल करता येते. विवेकशील निर्णय घेता येतो.

3. जातीविरहीत समाज (Castless Society) – जातीनिहाय समाजामूळे वंशतत्वाला प्राधान्य मिळते. वरीष्ठ जातींना राज्यात सुख–सोने तर कनिष्ठ जातींना काहीही न मिळणे ही दुर्दैवी स्थिती लोकशाहीला मारक ठरते. कनिष्ठ जातीच्या क्षमता, सामर्थ्य व गुणांना अजिबात संधी मिळत नाही. तर वरीष्ठ जातींच्या अतिचारास बंदी नाही. यामुळे कनिष्ठ जातींच्या नशिबी असहाय्य लाचारी येते. ही स्थिती बदलविण्यासाठी जातीविरहीत समाज आवश्यक आहे. भारतीय मतदार जातीच्या आधारावर मतदान करतात. पर्यायाने जातींचे बहुमत भारतीय बहुमत ठरते हे घातक आहे.



Scanned with OKEN Scanner

4. द्विपक्षपध्दती (Biparty System) – प्रबळ सत्ताधारी पक्ष व पर्यायी शासनासाठी समर्थ विरोधी पक्ष असे दोन तुल्यबळ पक्ष असावेत. त्यामुळे शासनावर उत्तम अंकुश व अपयशाप्रसंगी सरकार बनविण्याची समर्थता राजकीय पक्षांमध्ये राहील. सभागृहात सत्ताधारी पक्षाला आपल्या धोरणांचे व राज्यकारभाराचे समर्थन करावे लागते. सभासदांनी विचारलेल्या शंकाचे निरसन करावे लागते. सभागृहात विरोधी पक्ष असल्यामुळे सरकारचे ध्येयधोरण तावून सलाखून नीटनेटके होते. त्यादृष्टीने संतूलीत द्विपक्षपध्दती अस्तित्वात असे बाबासाहेबांना आवश्यक वाटते.

5. धर्मनिरपेक्षता (Secularism ) – भारतात अनेक धर्म आहेत. राष्ट्राच्या जडणघडणीत सर्वांचाच वाटा आहे. त्यामुळे कोणालाही कमी अधिक मानता येणार नाही. पर्यायाने सर्व धर्म भारतीय राज्यसंस्थेसमोर समान आहेत. धार्मिक संघर्षात आततायी प्रवृत्तीवर अंकुश घालणे. अन्यायग्रस्त लोकांना न्याय व संरक्षण मिळवून देणे हे राष्ट्रीय दायित्व आहे. तसेच राज्याने स्वतःस कोणतेही धार्मिक लेबल न लावता धर्माधिष्ठीत ऐवजी धर्मनिरपेक्ष राज्याचे तत्व स्विकारणे आवश्यक आहे.

6. विषमता निर्मूलन (Emancipation of Unequality)

कायमस्वरूपी विषम व अन्यायकारक विभागणी समाजात लोकशाहीविरोधी अवरोध निर्माण करते. स्नेह–सहकार्य–सहिष्णूता निर्माण होण्यात अडचणी येतात. म्हणून विषमतेचे निर्मूलन अनिवार्य आहे. असा बाबासाहेबांनी स्पष्ट इशारा दिलेला आहे.

7. घटनात्मक मुलभूत अधिकार (Constitutional Fundamental Rights) – लोकशाही यशस्वी होण्याकरीता नागरीकांचे मुलभूत अधिकार राज्यघटनेत अंतर्भूत असणे बाबासाहेबांना अगत्याचे वाटत होते. तसेच त्या अधिकारांना न्यायालयीन संरक्षण देखील असायला पाहीजे.

8. अल्पसंख्याकांची सुरक्षितता (ँमिहनंतके वित उपदवतपजपमे) – लोकशाहीच्या नावाखाली अल्पमतातील समाजघटकांची बहुमतवाल्यांकडून गळचेपी होता कामा नये. अल्पसंख्य असुरक्षित नसावेत. त्यांना बहुसंख्याकांच्या कारभारात आपले हितसंबंध दुखावणार नाहीत अशी खात्री वाटली पाहीजे.

9. नितीमान समाजव्यवस्था – (Morality in Social System) – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सामाजिक नीतीच्या अभावी लोकशाही यशस्वी होवू शकत नाही. समाजात अन्याय कोणावरही घडो; त्याच्या विरोधात उभे राहणे यालाच ते 'समष्टीची सद्सद्विवेकबुध्दी' म्हणतात. यामुळे समाजातील अन्यायाचे परीमार्जन होते. त्यांच्या मते लोकांचे चारित्र्य उच्च दर्जाचे असेल तर अनीती, पैसा, भ्रष्टाचार आदींना कुठेच वाव राहत नाही.

10. संवैधानिक नितीमत्ता (Constitutional Morality) – संविधान हा कायदेशीर तरतूदींचा व तत्वांचा केवळ सांगाडा असतो. त्यापलीकडे त्यांच्या दृष्टीने नीतीमत्तेला वरचे स्थान आहे. राज्यसत्तेचे कायदे जिथे पोहोचत नाही. तिथे नीतीनियम पोहोचतात. राज्यांच्या कायद्यापेक्षा



Scanned with OKEN Scanner

नैतिक संकेतांची अधिसत्ता नियंत्रण गाजवित असते. नैतिक संकेत ही संकलित बुध्दीमत्तेची निष्पती ठरते. ही संविधानीक नितीमत्ता निर्माण होणे आवश्यक आहे.

11. विभूतीपूजेला नकार ( Hero Worship ) – सर्वच राजकीय पक्षांनी विशेषतः सत्तारूढ पक्षाने पक्षहितापेक्षा राष्ट्रहिताला अधिक प्राधान्य दयायला पाहीजे. भारतात धर्माला अधिक महत्त्व देण्यात येते. धर्माच्या क्षेत्रात विभूतीपूजा मोक्षाकडे नेते तर राजकीय क्षेत्रात त्यामुळे अधःपतन होते. व्यक्ति कितीही मोठी असो, तिच्या पायावर आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये.

12. राष्ट्रप्रेमाची भावना निर्मिती – ( Patrotism)

I am the Indian first and last अशी अंतर्बाहय राष्ट्रभक्ती प्रत्येकांकडून बाबासाहेबांना अभिप्रेत होती. देशातील प्रत्येकामध्ये जाज्वल्य राष्ट्रप्रेमाची भावना प्रदीप्त व्हावयास पाहीजे. समाजातील भिन्नभिन्न घटकांत एकात्मतेची भावना वाढीला लागली पाहीजे.

सांसदीय शासनपध्दती भारतात जशीच्या तशीच स्विकारल्यास दुष्परीणाम घडून येतील कारण ब्रिटीश संसदेतील बहुमत राजकीय असते. तर भारतीय संसदेतील बहुमताचे स्वरूप जातीय राहील असे बाबासाहेब सांगतात. त्यांच्या मते अल्पसंख्यांक समाज सतत दुर्लक्षित राहील कारण मंत्रिमंडळात अल्पसंख्याकांना सामील करून घेण्याचे बंधन बहुसंख्याकांवर राहणार नाही. याची परिणती साम्राज्यवादात होईल. हे टाळण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालील अटी सांगितलेल्या आहेत.

1. मंत्रिमंडळात अल्पसंख्याकांचे प्रतिनीधी असले पाहीजे.
2. जे लोक अल्पसंख्याकांचे प्रतिनीधी म्हणून निवडले जातील. ते खऱ्या अर्थानी अल्पसंख्याकांच्या विश्वासाला पात्र पाहीजेत. ज्यांच्यावर त्यांचा विश्वास नाही त्यांना केवळ ते अल्पसंख्य जमातीचे आहेत. एवढयासाठी सहभागी करू नये.
3. बहुसंख्याकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कायदेमंडळाच्या नियंत्रणापासून कार्यपालीकामुक्त असावी. परिणामी कार्यकारी मंडळ स्थिर राहील.

भारतात सांसदीय पध्दत यशस्वी होण्यातील अडथळे

1. अंधश्रध्दा–परंपरा–रूढी 2. जातीय–वर्णवर्चस्व 3. निरक्षरता 4. संसदीय पध्दतीबाबत अज्ञान 5. आर्थिक विषमता 6. असहिष्णूता 7. विभूतीपूजा 8. विवेकपूर्ण लोकमताचा अभाव 9. विरोधी विचार दडपण्याची प्रवृत्ती 10. अल्पसंख्याकांचा प्रश्न.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. ते म्हणतात – "लोकशाही म्हणजे रक्तपातविरहीत मार्गानी लोकांच्या आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासनपध्दती होय" एका व्यक्तिला एक मत याऐवजी एक व्यक्ति एक मुल्य हे तत्व त्यांना अभिप्रेत होते. मानवी हक्क समाजातील सर्व स्त्री–पुरूषांना प्रत्यक्ष उपभोगता येईल अशी स्थिती निर्माण केली जाणे त्यांना अगत्याचे वाटत होते.



Scanned with OKEN Scanner

अध्यक्षीय व सांसदीय या जागतिक ख्यातीप्राप्त आदर्शांपैकी कोणता पर्याय निवडावा हा बाबतीत मुद्दा होता. भारतीय परिस्थितीचा साकल्याने विचार केल्यानंतर सांसदीय शासनपध्दतीच अधिक संयुक्तिक व श्रेयस्कर ठरेल. या मताशी ते सहमत झाले होते. याचा प्रत्यय 'संसदीय लोकशाही' या पुस्तकातून येतो. त्यांच्या संसदीय शासनपध्दतीचे फायदे पुढीलप्रमाणे –

1. लोकमताचा आदर – सरकारची नियुक्ती लोकमताच्या आधारावर होते. आपला जनाधार कायम राखण्यासाठी सरकार लोकमताला अपेक्षित नियम निर्मिती व आनुषंगिक कार्यवाही करते. मनःपूत लोकमताच्या विरोधातील शासन आगामी निवडणूकीत पदभ्रष्ट केले जाते. पर्यायाने लोकमताचा राज्यकर्तेपणाची मिरासदारी संपवून सार्वमताचे सरकार सत्तास्थानी येते. पर्यायाने लोकमताचा आदर अबाधित राहतो.
2. जबाबदार व मर्यादीत सत्ता :– कालानियत निवडणूका, संसदेचा विश्वास व विरोधी पक्षाची भूमिका यामूळे जबाबदार व मर्यादीत सत्ता आविष्कृत होण्यास मदत होते.
3. लोकगुणांचा विकास :– त्यांच्या मते संसदीय पध्दती हीच व्यक्तिच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, शिस्त, शिल, सचोटी, धारिष्ट्य, समर्पण इ. गुणांचा विकास करू शकते.
4. शांततामय सत्ता परिवर्तन :– सांसदीय लोकशाहीत लोकहितविरोधी सरकारला निवडणूकीद्वारे पदच्युत करता येते. स्वतंत्र निवडणूका घेतल्या जातात. मतदार निर्भिडपणे मतदान करतात. लोकप्रतिनीधींमधून पंतप्रधान निवडला जातो. अशाप्रकारे शांततामय मार्गाने परीवर्तन घडवून आणण्याची क्षमता केवळ सांसदीय लोकशाहीतच आहे. असे बाबासाहेबांचे मत होते.
5. उच्चतर राष्ट्रीय चारित्र्य निर्मीती :– संसदीय पध्दतीतील घटनात्मक नैतिक कायदे विवेकाच्या आधारे उच्चतर राष्ट्रीय चारीत्र्य निर्माण करतात. जनसामान्यांची संकलीत बुध्दीमत्ता, जननिष्ठा व सचोटी याद्वारे लोकांची सद्सद्विवेकबुध्दी, शिस्तबध्द राजकीय पक्ष परस्परविरोधी हितसंबंधाचा सोयीस्कर मेळ घालू शकतात. त्यामूळे उच्चतर राष्ट्रीय चारित्र्य निर्मिती होते.
6. शासनावर विरोधी पक्ष व वृत्तपत्रांचा अंकुश :– टिका करणे हा संसदीय लोकशाहीतील महत्वाचा हक्क आहे. संघटीत विरोधी पक्ष व प्रभावी वृत्तपत्रे 'वॉच डॉग' प्रमाणे आपले कार्य अव्याहतपणे करीत असतात. दोषारोपण करणे, भ्रष्ट सरकारविरूध्द लोकमत तयार करणे इ. कारणाने सत्ताधारी पक्ष हुकूमशाहीपासून परावृत्त राहून जबाबदारीची भुमिका निभावतो.
7. सर्वसमावेशकतेची शाश्वती :– ह्या पध्दतीत अल्पसंख्य, बहुसंख्य असा भेद न मानता स्थितीसापेक्ष विचार करून सर्वांचा समावेश होण्याची खात्री देता येते.
8. जनमतसंघटन :– विवाद्य प्रश्नासंबंधीचे निर्णय खुल्या व साधकबाधक चर्चेद्वारे सर्वांची सहमती मिळवून या पध्दतीत सोडविता येतात. त्यामुळे या पध्दतीत उचित जनमत संघटन उभारता येते.
9. चर्चेच्या माध्यमातून प्रश्नांची सोडवणूक :– जनतेचे प्रश्न आणि तक्रारी आपल्या प्रतिनीधींद्वारे प्रगट करण्याची संधी संसदीय लोकशाहीत लोकांना प्राप्त होते. वेगवेगळया प्रश्नांवर चर्चा होते



Scanned with OKEN Scanner

सर्व प्रतिनीधींना आपली मते व्यक्त करण्याची संधी प्राप्त होते. संसदेचे स्वरूप चर्चा मंडळीय व्यासपीठासारखे ठरते. जनतेच्या तक्रारी, प्रश्न आणि दु:खाना वाचा फोडण्याचे ते महत्वाचे केंद्र आहे.

10. विकासाची संधी :– वंशतत्वाऐवजी गुणात्मकतेवर भर व्यक्तिचा दृष्टिकोन विशाल बनविते. प्रत्येकाला राजकीय जीवनात सहभाग घेता येतो. यामुळे स्वाभिमान, आत्मविश्वास, बळावून अतिउत्साहाने मुक्त स्पर्धेत स्वतःची उन्नती साधणे शक्य होते. अवनत वर्गासाठी आरक्षण व उन्नत वर्गाच्या अतिरेकांवर प्रतिबंध यामूळे सर्वांच्या विकासाच्या समतोल राखून व्यक्ति विकास घडविला जातो.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानूसार पाश्चात्य देशांमध्ये सांसदीय लोकशाही अपयशाचे विवेचन केलेले आहे. ते खालीलप्रमाणे:–

1. स्वातंत्र्य, समता व इतर सोयी देण्यातील अपयश :– ज्या देशात सांसदीय लोकशाही होती. तेथे स्वातंत्र्य, समता व इतर सोयी देण्यास ही पध्दती अपयशी ठरली. त्यामूळे लोकांचा असंतोष वाढला. स्वकेंद्रीत हितसंबंधाची जोपासना व बहुसंख्याकांच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष आर्थिक विषमता वाढविण्यास कारणीभूत ठरले.
2. मंदकार्यगती :– सांसदीय शासनप्रणालीत कार्याची गती अतिशय मंद असते. ह्या पध्दतीत सर्व निर्णय चर्चा करून घेण्यात येतात. त्यामुळे जनतेची कामे लवकर होत नाहीत. कामात विलंब लागल्यामुळे जनतेत असंतोष वाढतो. दिरंगाईची कायदेनिर्मिती लोकक्षोभास कारणीभूत ठरते.
3. आर्थिक व सामाजिक विषमता :– सांसदीय शासन प्रकारात राजकीय लोकशाही निर्माण झाली. परंतु आर्थिक आणि सामाजिक विषमता कायम राहीली. परीणामतः गरीबांची पिळवणूक जनक्षोभास क्रमप्राप्त ठरली.
4. वर्गीकृत समाज निर्मिती :– एकदा आपले प्रतिनीधी निवडून दिले की, आपली जबाबदारी संपली अशी जनतेची मानसिकता बनते. शासक व शासित असे दोन वर्ग समाजात निर्माण होतात. शासितांना शासक बनता येत नाही. शासकाचा वेगळा वर्ग निर्माण झाल्यामुळे तो सतत वरचढ होण्याचा प्रयत्न करीत असतो. ते समाजासाठी घातक ठरते.

मुख्यत्वे आर्थिक विषमता संपविल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही. राजकीय समता निरर्थक ठरेल. परीणामतः स्वातंत्र्याच्या डोलारा जनता स्वतःच भुईसपाट करेल. म्हणून कायदयापेक्षा नीतीला महत्व दिले पाहीजे. मुठभर प्रस्थापितांच्या हिताला अग्रक्रम देताना सकल समाजाची सम्यक प्रगती व्हावी. त्यासाठी लोकशाहीला भारतीय परीप्रेक्ष्यात प्रस्थापित करण्यासाठी बुध्दीप्रामाण्यवादी विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन कसा रूजेल? प्रचलीत पाखंडी अंधश्रध्दांची जळमेट समाप्त होणार नाही. धर्मशास्त्राने समाजमनाची अनादी काळापासून गोची केलेली आहे. वैचारीक प्रक्रिया गोठल्यावर सत्याचा शोध लागूच शकत नाही. नवोन्मेषी संशोधनापासून परांगदा झाल्याने आम्हाला युध्द सामग्रीसाठी अन्य राष्ट्रांपूढे भिकाऱ्याप्रमाणे हात पसरावे लागतात.



Scanned with OKEN Scanner




**CONTACT FOR SUBSCRIPTION**

**AJANTA ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**
**Vinay S. Hatole**
**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004.**
**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**
**E-mail : ajanta5050@gmail.com Website : www.ajantaprakashan.com**

Scanned with OKEN Scanner